सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे **"सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती "राष्ट्रीय एकता सप्ताह"** म्हणून साजरा करणेबाबत या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१११९/(प्र.क्र.१३७/१६/समन्वय, दिनांक २१.१०.२०१६ ची प्रत सोबत जोडत आहे.

—·—·—·—·—·—·—

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१६/शा२५३७२
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : २९।१०।२०१६

प्रति,

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे व पुढील कार्यवाही करावी.

( डॉ. अ.तु. पिसे )
उपसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रतः- कार्यासन क्रमांक१२, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

श्री शिंदे
संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.
29.10.16

सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती " राष्ट्रीय एकता सप्ताह " म्हणून साजरा करणेबाबत.
**( दि.३१ ऑक्टोबर, २०१६ ते दि.०६ नोव्हेंबर, २०१६ ).**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -१११९/(प्र.क्र.१३७/१६)/समन्वय**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २१ ऑक्टोबर, २०१६.

**संदर्भ :-** अपर सचिव, भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे अ. शा. प. क्र.C.30021/09/2016-CDN, Dt.14/10/2016.

**शासन परिपत्रक -**

संदर्भाधिन पत्रान्वये केंद्र शासनाने दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ ते ०६ नोव्हेंबर, २०१६ हा कालावधी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त " राष्ट्रीय एकता स्प्ताह " म्हणून देशभर साजरा करण्याचे ठरविले आहे.

२. सरदार पटेल यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कार्यात मोठे योगदान दिले आहे. म्हणून त्यांना भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखण्यात येते. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्ताने या विभागाच्या अखत्यारितील विद्यापीठे /महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांनी खालील उपक्रम / कार्यक्रम खालीलप्रमाणे राबवावेत असे निदेश देण्यात येत आहेत. :-

१) भारतीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी शहरे, गाव व ग्रामीण भागांमध्ये विद्यार्थ्यांची ऐक्य दौड ( Unity Runs ) आयोजित करणे.

२) एकात्मतेवर आधारित जास्तीत जास्त सर्जनशिल क्लीप्स तयार करण्यात याव्यात. ( Most Creative Slogan ). त्यातील ३ उत्कृष्ट क्लीप्स मा. पंतप्रधानमंत्री कार्यालयास सादर करण्यासाठी निवडण्यात याव्यात.

३) उच्च शिक्षण संस्थांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होण्यासाठी आंतरविभागीय ( Inter Departmental ) स्पर्धांचे आयोजन करणे.

४) एकात्मतेवर आधारित संगीत, नाटक व एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. यातील जास्त सर्जनशिल असलेल्या विषयाला ( Most Creative Theme ) पारितोषिक देण्यात यावे.

५) सरदार वल्लभभाई पटेल यांचे व्यक्तीमत्व व त्यांच्या ऐतिहासिक योगदानाबाबत निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.

६) " सध्याच्या भारतात सरदार वल्लभभाई पटेल यांचे महत्त्व व समपर्कता " या विषयावर वक्तृत्व / निबंध स्पर्धेचे आयोजन करणे.

७) भारताच्या एकीकरणाच्या विषयावर टी-शर्ट व टोप्यांच्या कलाकृती करण्याची स्पर्धा आयोजित करणे.

८) एकता या विषयावर जास्तीत जास्त सृजनात्मक घोषवाक्ये तयार करण्यात यावीत.

९) सरदार वल्लभभाई पटेल यांचे व्यक्तीमत्व आणि योगदानावर आधारित निबंध लेखन पारितोषिकपर स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.

१०) विद्यार्थ्यांनी त्यांच्या भागात राहणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या भेटी घेऊन, त्यांचे स्वांत्र्यलढयातील योगदान तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आठवणी याबाबतच्या कथा व आजच्या राष्ट्रीय एकतेबाबतचे विचार याबाबतची माहिती प्राप्त करुन घ्यावी.

३. यासंदर्भात दि.३१ ऑक्टोबर व त्यानंतर घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे फोटो दि.०६ नोव्हेंबर, २०१६ नंतर मा. मंत्री महोदय यांच्या Whats App व e-mail वर टाकण्यात यावेत. या मोहिमेसाठी तयार करण्यात आलेला e-mail sardarpatelanniv2016@gmail.com व Whats App क्रमांक ०९९१००६३७०१ आहेत.

४. तरी उपरोक्तप्रमाणे दिलेल्या सूचना काटेकोर पाळाव्यात व सरदार वल्लभभाई पटेल " राष्ट्रीय एकता सप्ताह " दि. ३१ ऑक्टोबर, २०१६ ते दि.०६ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत पार पाडण्यात यावा, ही विनंती.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६१०२११५२४२९६८०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Rambhau Kharat

Digitally signed by Siddharth Rambhau Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharth Rambhau Kharat
Date: 2016.10.21 15:26:08 +05'30'

(सिद्धार्थ खरात)
उप सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
११. निवडनस्ती.